२ पुण्य नगरी ■ मंगळवार, ११ ऑक्टोबर २०२२

# ‘विवेकानंद’मध्ये वन्यजीव सप्ताह उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागातर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहामध्ये रांगोळी, फोटोग्राफी, भित्तीपत्रके, क्राफ्ट मॉडेल, भित्तीपत्रके निबंध, वक्तृत्वा अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. श्रुती जोशी यांची उपस्थिती होती. बी.एस्सी.च्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. सप्ताहाच्या सांगताप्रसंगी ‘वन्यजीव संवर्धन व कायदे’ या विषयावर वन विभागाचे निवृत्त अधिकारी डी. बी. शेंडगे यांचे व्याख्यान झाले. स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. प्राचार्य डॉ. कुंभार आणि विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के, डॉ. टी. सी. गौपाले यांचे मार्गदर्शन लाभले.

# विवेकानंद कॉलेजमध्ये ‘न्युरोडीजनरेशन अ ग्रोविंग बर्डन’ विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयामध्ये प्राणीशास्त्र विभागामार्फत ‘न्युरोडीजनरेशन अ ग्रोविंग बर्डन’ विषयावर व्याख्यान झाले. न्यू कॉलेजच्या प्रमुख प्राणीशास्त्र विभागातील डॉ. कविता गाजरे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. डॉ. गाजरे यांनी न्युरोडीजनरेशनची वाढती समस्या, त्याची कारणे, त्यासंबंधीचे आजार, न्युरोडीजनरेशनमुळे जागतिक, कुटुंब पातळीवर, वैयक्तिकरीत्या होणारे परिणाम आणि त्यांचे उपाय यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांनी केले. प्रास्ताविक डॉ. एस. एस. देसाई यांनी केले. प्रा. एन. ए. पटेल यांनी आभार मानले.

पुढारी

# 'विवेकानंद'मध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेजमध्ये जागतिक एड्स दिनानिमित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सीपीआर रुग्णालयाने तयार केलेल्या प्रश्नावलीवर आधारित स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील प्राणीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. टी. सी. पाटील यांनी केले. डॉ. एस. एस. देसाई यांनी आभार मानले.

माझी कोल्हापूर आवृत्ती
३ डिसेंबर २०२२ पृष्ठ क्रमांक २
news.pudhari.co.in

# विवेकानंदमध्ये न्युरोडीजनरेशन अ ग्रोवींग बर्डन या विषयावर व्याख्यान संपन्न

**कोल्हापूर** : येथील विवेकानंद महाविद्यालयामध्ये प्राणीशास्त्र विभागामार्फत न्युरोडीजनेरेशन अ ग्रोवींग बर्डन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. व्याख्यानासाठी दि न्यू कॉलेज प्राणीशास्त्र विभागाच्या डॉ. कविता गाडे यांचे मार्गदर्शन लाभले. या व्याख्यानांतर्गत डॉ. गाडे यांनी न्युरोडीजनेरेशनची वाढती समस्या, त्याची कारणे, तसेच त्यासंबंधीचे आजार, तसेच न्युरोडीजनेरेशनमुळे जागतिक, कुटुंब पातळीवर तसेच वैयक्तिकरित्या होणारे परिणाम आणि त्यांचे उपाय याबर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार हे होते. कार्यक्रमाचे नियोजन प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांनी केले. प्रास्ताविक डॉ. एस. एस. देसाई यांनी केले तर आभार प्रा. एस. ए. पटेल यांनी मानले.


**PUBLIC NOTICE**

This is to give notice to the Public at large that 1) Original Sale Agreement dated 5th May, 1985 executed between M/s. Sudarshan Developers and Mr. Merchant Ramzan Ali Nazar & Mr. Merchant Abdul Rehman, 2) Original Sale Agreement dated 5th March, 1993 executed between Mr. A. R. Merchant and Mr. A. M. Doshi, 3) Original Deed of Transfer dated 8th August, 1994 executed between Mr. A. M. Doshi and Mr. Darshan Ashok Doshi, 4) Original Agreement for Sale dated 24th June, 1997 executed between Mr. Darshan Ashok Doshi and Mr. Narayan Vithaldas Suthar & Mrs. Savita Narayan Suthar; in respect of the property being Flat No. 6, on the Ground Floor of the building known as Sudarshan Co-op. Hsg. Soc. Ltd., admeasuring build-up area 500 sq. ft. situated at Village Virar, Jivdani Mandir Road, Near Ganesh Hospital, Virar East, District Palghar – 401305 which is owned by Mrs. Diksha Vishwanath Pandhare are lost and complaint of the same has been done in Oshiwara Police Station.

Any person having any claim, right, title and/or interest or demands to in or against the said property by way of sale, mortgage, conveyance, encumbrance, trust, line, possession, gift, inheritance, order of injunction, in respect thereof he/she is needed to inform about the same to the undersigned at the below mentioned address within 7 days from the date of publication hereof either by hand delivery against proper written acknowledgement of the undersign or by the Registered post A.D. Failing which the claims of such person/s will be deemed to have been waived and/or abandoned.

Place: Mumbai

Date: 26th April, 2023

Sd/-

**Adv. Ashutosh S. Pandey**

Chamber No. 4, Mangalmay Karyalay, Opp. Bandra Court, A. K. Marg, Bandra West, Mumbai – 400051, 9892484443


## मिरा–भाईंदर महानगरपालिका

पुढारी ३ शुक्रवार, ४ नोव्हेंबर २०२२

# 'विवेकानंद'मध्ये जीवशास्त्रीय तंत्र विषयावर भित्तीपत्रकाचे प्रदर्शन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने 'विविध जीवशास्त्रीय तंत्र' या विषयावर भित्तीपत्रकाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी पी.सी.आर., हायब्रीडोमा, एस.डी.एस. पेज, जेल इलेक्ट्रोफोरोसीस, जीन क्लोनिंग यासारखे वेगवेगळे टेकनिक्स भित्तीपत्रक प्रदर्शनात होती. प्रास्ताविक डॉ. पी. सी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. एस. एस. देसाई यांनी केले. वाय. एस. पुजारी यांनी आभार मानले.